# गोमंत भारती

## मराठी, इयत्ता – पहिली

(सुधारित आवृत्ती)

२०१९

शिक्षण संचालनालय, पर्वरी.
गोवा सरकार

मुद्रण : २००७
मुद्रण : २००८
पुनर्मुद्रण : २००९
पुनर्मुद्रण : २०१०
पुनर्मुद्रण : २०११
पुनर्मुद्रण : २०१२
पुनर्मुद्रण : २०१३
पुनर्मुद्रण : २०१४
पुनर्मुद्रण : २०१५
पुनर्मुद्रण : २०१६
पुनमुद्रण : २०१७
पुनमुद्रण : २०१८
पुनमुद्रण : २०१९

© राज्य शिक्षणशास्त्र संस्था, आल्त-पर्वरी, गोवा - ४०३ ४२१.

**प्रकाशक :** संचालक, शिक्षण संचालनालय, पर्वरी,
गोवा- ४०३००९

**अक्षरजुळवणी :** शिवम ऑफसेट,
प्लॉट नं. डी-१११, कागल फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी.,
कागल, कोल्हापूर - ४१६ २३६. मोबा. ०९८२२५५३३९४
ई-मेल : shivamoffset2000@gmail.com

**छापणी :** शिवम ऑफसेट,
प्लॉट नं. डी-१११, कागल फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी.,
कागल, कोल्हापूर - ४१६ २३६. मोबा. ०९८२२५५३३९४
ई-मेल : shivamoffset2000@gmail.com

किंमत : ₹ 15/-

# निवेदन

युनिसेफ प्रकल्प प्राशिअनू-प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे नूतनीकरण या योजनेचा फायदा घेऊन 'राज्य शिक्षणशास्त्र संस्था, आल्त-पर्वरी, गोवा' या संस्थेतील 'अभ्यासक्रम विकसन कक्षा' ने इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीपर्यंतचा नवीन अभ्यासक्रम तयार केला आहे. त्या अभ्यासक्रमाला धरून इयत्ता पहिलीचे मराठी विषयासाठी तयार करण्यात आलेले 'गोमंतभारती - पुस्तक पहिले' आपल्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद वाटतो.

मराठीचे हे पुस्तक गोव्यातील स्थानिक वातावरणाशी सुसंगत असे तयार केले आहे. गोव्यातील निवडक तीस शाळांतून हे पुस्तक प्रत्यक्ष शिकवून पाहिले आहे. शिवाय या पुस्तकाचे भाषातज्ज्ञांच्याकडून मूल्यमापन करवले आहे. शिक्षकांनी व तज्ज्ञांनी केलेल्या सूचनांचा विचार करून पुस्तकाची ही सुधारित आवृत्ती तयार केली आहे.

हे पुस्तक तयार करण्याच्या कामी खालील व्यक्तींचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत.


## लेखन समिती

श्रीमती प्रिया फडके - प्रकल्प संघटक, राज्य शिक्षणशास्त्र संस्था, आल्त-पर्वरी, गोवा.

| | |
|---|---|
| श्री. जयराम कामत | श्री. ज्ञानेश्वर कोलवेकर |
| श्री. चंद्रकांत पै कीर | श्री. प्रकाश नाईक |
| श्री. य. बा. सुतार | श्री. न. तु. कुलकर्णी |
| श्री. पां. र. थळी | श्री. म. कृ. पाटील |
| श्री. सोमनाथ कोमारपंत | श्रीमती सुशांता नेसरीकर |
| श्रीमती उषा जोगळेकर | श्रीमती वैजयंती प्रभूगावकर |

# अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | नमन | १ | १९. | फुगडी | २२ |
| २. | बस | २ | २०. | काजू | २४ |
| ३. | बघ | ३ | २१. | मासेच मासे | २६ |
| ४. | चल | ४ | २२. | आमचे बैल | २८ |
| ५. | अकबर | ५ | २३. | बोला बोला हे कोण? | ३० |
| ६. | इसवण | ६ | २४. | डौलदार देऊळ | ३२ |
| ७. | इसवण तळ | ७ | २५. | नाताळची गंमत | ३४ |
| ८. | फणस | ८ | २६. | वाचा आणि लिहा | ३६ |
| ९. | औषध | ९ | २७. | बिलूबाय बिलूबाय | ३९ |
| १०. | कळस | १० | २८. | शूर शिपाई | ४० |
| ११. | भजन | ११ | २९. | सांगा, मी कोण? | ४२ |
| १२. | अंगण | १२ | ३०. | शिमगा मेळ | ४४ |
| १३. | सहल | १३ | ३१. | हुशार कावळा | ४६ |
| १४. | अक्षर आठव | १४ | ३२. | इगर्ज | ४८ |
| १५. | आठवण | १५ | ३३. | हातावरला डाव | ५० |
| १६. | भाट | १६ | ३४. | चंदाताई | ५२ |
| १७. | निळा पिवळा | १८ | ३५. | सुट्टी झाली | ५४ |
| १८. | चानी | २० | ३६. | पहा-बोला-लिहा | ५६ |

## १. नमन

नमन कर.

गगन, नमन कर.

| नमन | गगन | कर |
|---|---|---|

| न | म | ग | र | क |
|---|---|---|---|---|




## २. बस


गगन, बस.

पवन, बस.

पवन   बस

प   व   ब   स





## ३. बघ

रतन, बस.

कमळ बघ.

ए पवन, मगर बघ.

बघ   कमळ   रतन   मगर

त   ए   घ   ळ



## ४. चल

रतन, चल.
पवन, लवकर चल.
गगन, चटकन उतर.
पळ पळ.

चल | पळ | उतर | लवकर | चटकन

ट | च | उ | ल






## ५. अकबर

अकबर, पळ.
पवन, पळ.
रतन, दगड बघ.
गगन, दगड उचल.

उचल | दगड | अकबर

द | अ | ड



## ६. इसवण

इसवण बघ.
पवन, इसवण बघ.
गगन, इसवण धर.

| | |
|---|---|
| धर | इसवण |

| | | |
|---|---|---|
| ध | इ | ण |





## ७. इसवण तळ

गगन, इसवण आण.
रतन, पळ. जळण आण.
आई, इसवण तळ.
गगन, मदत कर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पळ | आण | आई | तळ | जळण | मदत |

| | | | |
|---|---|---|---|
| ठ | ज | ई | आ |




## ८. फणस

उदय, फणस बघ.
पवन, वर चढ.
झरझर वर चढ.
एकच फणस उतरव.

चढ | वर | उदय | फणस

एकच | उतरव | झरझर

ढ | य | फ | झ






## ९. औषध

गगन, ऊठ. लवकर चल.
पटकन हळद आण.
चटकन औषध बनव.
रतन, चटई पसर.
पवन, चटईवर बस.

ऊठ | पसर | हळद | बनव

औषध | पटकन | चटई

ष | औ | ह | ऊ



## १०. कळस

उदय, कळस बघ.
रथ बघ.

रतन, यज्ञ बघ.
गगन, सनई ऐक.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऐक | रथ | यज्ञ | कळस | सनई |

| | | |
|---|---|---|
| थ | ऐ | ज्ञ |





## ११.भजन

रतन, मखर बघ.
नमन कर.
गगन, बस.
पवन, बस.
गगन, भजन ऐक.
पवन, भजन ऐक.

| | |
|---|---|
| भजन | मखर |

| | |
|---|---|
| भ | ख |

## १२. अंगण



चल चल अंजन.
बघ बघ अंगण.
वर बघ अंबर.
कर चल छनछन.
झन झन झननन.
छम छम छननन.

| | | | |
|---|---|---|---|
| अंजन | अंगण | अंबर | छमछम |
| छनछन | छननन | झननन | |

अं छ





## १३. सहल

शबनम, हरण बघ.
अक्षय, अजगर बघ.
ओवळ, चटई अंथर.
इवलन, बस. कप धर.
रतन, सरबत ओत.
परत एक कप भर.

| | | | |
|---|---|---|---|
| सहल | हरण | ओवळ | अंथर |
| अक्षय | अजगर | शबनम | सरबत |

श क्ष ओ




## १४. अक्षर आठव

रतन, ओळ आख.
गगन, ''ङ'' अक्षर बघ.
पवन, ''ञ'' अक्षर बघ.
रतन, ''ऋ'' अक्षर बघ.
आठवण कर. अक्षर ओळख.
अक्षर आठव. अक्षर बघ.

ओळ | अक्षर | आख

ओळख | आठवण


ङ | ञ | ऋ



## १५. आठवण

कप घर छत झर ढग ऊस एक
रथ यज्ञ ओठ कमळ बदक
भजन फलक मखर दगड चटई
उखळ सनई जळण ऐरण शहर
औषध अंगण अननस आई इसवण

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए |
| ऐ | ओ | औ | अं | अः | ऋ | |
| क | ख | ग | घ | ङ | | |
| च | छ | ज | झ | ञ | | |
| ट | ठ | ड | ढ | ण | | |
| त | थ | द | ध | न | | |
| प | फ | ब | भ | म | | |
| य | र | ल | व | श | ष | |
| स | ह | ळ | क्ष | ज्ञ | | |




## १६. भाट



चला चला.
भाटात जाऊ.
फणस बघा.
अननस बघा.



माडावर चढा.
नारळ पाडा. सावकाश उतरा.
कापा फणस, रसाळ फणस.
झाडावर चढा.
फणस उतरवा.




अननस बघा. अननस आणा.
कायतान, हसन, छाया,
भारत, माधव या या.
फणस खा. अननस खा.
हसा, नाचा. मजा करा.
चला, जाऊ आता घरा.



| कापा | आणा | आता | काढा |
|---|---|---|---|

| | |
|---|---|
| क + ा = का | अ + ा = आ |
| भ + ा = भा | प + ा = पा |
| ढ + ा = ढा | ण + ा = णा |



## १७. निळा पिवळा

विमल,

कागद आण.

सिरिल,

कागद आण.



आता काढा कागदावर
निळा निळा सागर.
गडद निळा सागर.
आता काढा पिवळा नाग.
पिवळा धमक नाग.
आता काढा हिरवा मळा.
हिरवागार मळा.

| | | |
|---|---|---|
| आणि | निळा | विमल |
| पिवळा | सिरिल | हिरवा |

| | |
|---|---|
| ि + प = पि | ि + र = रि |
| ि + न = नि | ि + ह = हि |
| ि + व = वि | ि + ण = णि |



## १८. चानी

चक चक चानी
रानाची राणी
झाडावर झरझर
माडावर सरसर



गाडीवर चढली
माडावर चढली
नाही कधी अडली
नाही कधी पडली

कशी नाही भीती
धीट पहा किती
चक चक चानी
किती किती शहाणी

| चानी | भीती | गाडी | धीट |
|---|---|---|---|
| शहाणी | अडली | | |

| | |
|---|---|
| न + ी = नी | त + ी = ती |
| ण + ी = णी | भ + ी = भी |
| ल + ी = ली | ध + ी = धी |
| ड + ी = डी | ह + ी = ही |



## १९. फुगडी

फु फु फु फु – फुगडी
बघ ग कुमुद घुमली.
फु फु फु फु – फुगडी
सुमन नाही दमली.



फु फु फु फु – फुगडी
कुमुद का ग रुसली?
कुमुद कुमुद सुपारी
लगीन कर ग दुपारी.
कुमुद कुमुद जुवारी
चल ग चल ग किनारी.
फु फु फु फु – फुगडी
घुम घुम घुम घुमली.
फु फु फु फु – फुगडी
सगळी हासत सुटली.

| | | |
|---|---|---|
| घुमली | कुमुद | सुपारी |
| दुपारी | जुवारी | रुसली |

| | |
|---|---|
| क + ु = कु | फ + ु = फु |
| म + ु = मु | स + ु = सु |
| र + ु = रु | घ + ु = घु |



## २०. काजू

चला,
आपण आज
रानात जाऊ.
झाडावर चढू.
काजू काढू.
आपण झाडाखाली बसू.
बिया भाजू.
गर काढू.





गूळ घालू
आणि
आपण लाडू करू.
बाबू, बस.
रवळू, बस.
शाणू, बस.
बाबू, तू लाडू खा.
शाणू,
तू पण लाडू खा.

| | | | |
|---|---|---|---|
| जाऊ | काजू | शाणू | काढू |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | + | ू | = | जू | स | + | ू | = | सू |
| ढ | + | ू | = | ढू | ण | + | ू | = | णू |
| र | + | ू | = | रू | त | + | ू | = | तू |
| ब | + | ू | = | बू | ळ | + | ू | = | ळू |



## २१. मासेच मासे

खेमू गेला जाळे घेऊन.
देमू गेला जाळे घेऊन.
खेमूने लावले जाळे.
देमूने लावले जाळे.





खेमू-देमूला मिळाले मासे.
मासेच मासे,
खूप खूप मासे.

खेकडे, पेडवे,
पापलेट, तारले.
शेवतूने ते
पाटलीत भरले.
बाजारात नेऊन
लगेच विकले.

| खेकडे | पेडवे | तारले | जाळे | देमू |
|---|---|---|---|---|

| | |
|---|---|
| ख + े = खे | व + े = वे |
| ड + े = डे | न + े = ने |
| प + े = पे | र + े = रे |
| ल + े = ले | ब + े = बे |



## २२. आमचे बैल

सैरू भैरू आमचे बैल.
आहेत काळे बाळे
दिसतात कसे जुळे.



कैलास,

हे आमचे बैल आहेत.
रतन, सैरू भैरूला पाणी दाखव.
पवन, सैरू भैरूला वैरणही घाल.

कैलास,

गावात खूप बैल आहेत.
पण,
पैकूळ गावचे वैभव
सैरू भैरू.

| बैल | वैरण | पैकूळ | वैभव |
|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | + | ै | = | मै | क | + | ै | = कै |
| भ | + | ै | = | भै | स | + | ै | = सै |
| व | + | ै | = | वै | ब | + | ै | = बै |
| प | + | ै | = | पै | | | | |

## २३. बोला बोला हे कोण?

काळा कोट घालतात.
सदाच धोतर नेसतात.
डोकीला टोपी घालतात.
बोलताना खोकतात
आणि
खोकताना बोलतात.
भजन ऐकून डोलतात.
काठी टेकत चालतात.







पण चोरालाही ठोकतात.
बोला बोला, हे कोण?
ऐकतेस ना ग शोभा?
हे तर गोकुळचे आजोबा!

| बोला | कोट | चोर | टोपी | धोतर |
|---|---|---|---|---|

| | |
|---|---|
| ब + ो = बो | ज + ो = जो |
| क + ो = को | ड + ो = डो |
| च + ो = चो | ग + ो = गो |



## २४. डौलदार देऊळ

गौरीश, हे बघ कामाक्षीचे देऊळ.
देऊळ किती नक्षीदार,
मोठे आणि डौलदार!



देऊळ बघायला लोक हौसेने येतात.
देवळात मोठा चौक आहे.
लोक चौकात बसतात.
येथे सकाळीच नौबत वाजते.
चौघडाही वाजतो.

समोर चौकोनी तळी आहे.
दोन नौका जोडतात आणि
तळीत चौफेर फिरवितात.

मग, दारूकामाची आतषबाजी पाहून
मौजच मौज होते.

| चौक | नौबत | मौज |
|---|---|---|

| | |
|---|---|
| ग + ै = गौ | ह + ै = हौ |
| म + ै = मौ | न + ै = नौ |
| च + ै = चौ | ड + ै = डौ |



## २५. नाताळची गंमत

आंतोन, नाताळ जवळ आला.
घर रंगवून झाले का?
आपण अंगण साफ करू.
सांतान, तू अंगणात नाताळाचे झाड लाव.



एका फांदीवर खेळणी बांध आणि
एका फांदीवर चेंडू बांध.
खाऊचे पुडेही बांध.
अंजेला, तू रंगीबेरंगी फुगे बांध.
तांबडे, जांभळे, नारिंगी फुगे.
सुंदर सुंदर, रंगीत
कागदी कंदील बांध.
छान छान!
आता आपण नाताळाचे झाड पहायला
इंदूला बोलावू,
महंमदला बोलावू, पंढरीलाही बोलावू.
गंमत जंमत करू.

| फांदी | चेंडू | रंगीत | नारिंगी | सुंदर |
|---|---|---|---|---|

| | |
|---|---|
| फा + ं = फां | चे + ं = चें |
| र + ं = रं | इ + ं = इं |
| सु + ं = सुं | बा + ं = बां |



## २६. वाचा आणि लिहा

दसरा, दात, दिवस, दीपक, दुकान, दूध, देठ, दैवत, दोन, दौलत, दंगा, कंगवा, खांदा, चिंच, मुलींचा खेळ, फुंकणी, खडूंचा ढीग, चेंडू, पैंगीण, डोंगर, कौंतेय.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं |
| - | ा | ि | ी | ु | ू | े | ै | ो | ौ | ं |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खै | खो | खौ | खं |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गै | गो | गौ | गं |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घै | घो | घौ | घं |



| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चै | चो | चौ | चं |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छै | छो | छौ | छं |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जै | जो | जौ | जं |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झै | झो | झौ | झं |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टै | टो | टौ | टं |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठै | ठो | ठौ | ठं |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डै | डो | डौ | डं |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढै | ढो | ढौ | ढं |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णै | णो | णौ | णं |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तै | तो | तौ | तं |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थै | थो | थौ | थं |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दै | दो | दौ | दं |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धै | धो | धौ | धं |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नै | नो | नौ | नं |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पै | पो | पौ | पं |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फै | फो | फौ | फं |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बै | बो | बौ | बं |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भै | भो | भौ | भं |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मै | मो | मौ | मं |
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यै | यो | यौ | यं |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रै | रो | रौ | रं |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लै | लो | लौ | लं |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वै | वो | वौ | वं |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो | शौ | शं |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षै | षो | षौ | षं |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सै | सो | सौ | सं |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | है | हो | हौ | हं |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळै | ळो | ळौ | ळं |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षै | क्षो | क्षौ | क्षं |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञै | ज्ञो | ज्ञौ | ज्ञं |



## २७. बिलूबाय बिलूबाय

आली बघा गुपचूप, बिलूबाय बिलूबाय
अंग कसे रेशमासारखे, शेपूट कसे गोंडेदार
आईला मासे साफ करू देत नाही
आजीला कालवण शिजवू देत नाही
हिचे आपले सदा मियांव
घरात मियांव दारात मियांव
सदाच डोळा दुधावर
सायीवर आणि मासळीवर
मासे पहाताच मियांव करते
उंदीर दिसताच डोळे मिटते.
बिलूबाय बिलूबाय
खोडच तुझी मोडायची
उपाशी तुला ठेवायची
नाही दूध, नाही मासे
चटकन उंदीर पकड कसे!



| | | | |
|---|---|---|---|
| पकड | साय | बिलू | कालवण |
| तुझी | शेपूट | मासे | उंदीर |



## २८. शूर शिपाई

एक दोन तीन चार
चार तीन दोन
लहानशा शिपायाला
अडवितो कोण?



पाच सहा सात आठ
आठ सात सहा
नेमबाजी आता माझी
थोडावेळ पहा!
नऊ दहा अकरा बारा
बारा अकरा दहा
शूर असे शोधून कुठे
मिळतात का पहा!
तेरा चौदा पंधरा सोळा
सोळा पंधरा चौदा
शूर अशा शिपायाला
चिडवू नकोस दादा!
सतरा अठरा एकोणीस
आणि पुढे वीस
खेळ असा खेळताना
संपू नये दीस!!



## २९. सांगा मी कोण?



कमरेला लंगोटी
हातात कोयती
माडावर चढतो
नारळ पाडतो
सांगा, मी कोण?



डोकीवर टोपला
केसात झेला
हातात गाथण
करू नका भांडण
सांगा, मी कोण?





सायकलीवर बसतो
सांज सकाळ येतो
पो पो करतो
पाव पोळी देतो
सांगा, मी कोण?



शेतात राबतो
भात, नाचणी पिकवतो
पूत भुईचा
आधार लोकांचा
सांगा, मी कोण?



झोपडीत राहतो
बोकडं पाळतो
कडं हातात
बाळी कानात
सांगा, मी कोण?

(पाडेली, मासेवाली, पाववाला, शेतकरी, धनगर)



## ३०. शिमगा मेळ

घुमचे कटर, घुमचे कटर, घुमचे कटर घूम
घुम घुम घुम, घुम घुम, घुमचे कटर घूम ॥

ढुमचे कटर, ढुमचे कटर, ढुमचे कटर ढूम
ढुम ढुम ढुम, ढुम ढुम, ढुमचे कटर ढूम ॥



झिन झीन झिन, झिन झीन झिन, झिन झीन झिन झिन
झिन झीन झिन, झीन झीन, झिन झीन झिन झिन ॥

मेळ खेळा कासाळ ढोल आणा वाजवा
झिक नळ झिन झिंग झिंग सूर घुमवा ॥

पें पें पें पें पों पों पों पों साथी आले
तुं तूं तुं तूं तूं ऽ तु ऽऽ शिंग वाजले ॥

ढोल शेमेळ कासाळ शिंग वाजू लागले
मेळ आता ताल धरून नाचू लागले ॥

घुमचे कटर पें पों तूं तूं ढुम झीन झाले
थैय थैय था, बले बले, बले बले बले ॥

शबै शबै, थैय थैय था, बले बले बले!!!

| | | | |
|---|---|---|---|
| कासाळ | शेमेळ | ढोल | शिंग |
| थैय | थैय | शबै | शबै |



## ३१. हुशार कावळा

एक होता कावळा
तो होता काळा काळा.
कहाणी त्याची ऐक बाळा.

कावळा गेला सहलीला.
इकडे गेला तिकडे गेला.
फिरून फिरून खूप दमला.
काव काव करू लागला.
पाणी लागला शोधायला.



शोधता शोधता घर दिसले.
घराजवळ मडके दिसले.
मडके पाहून जवळ गेला.
त्यावरती उडून बसला.

मडक्यामध्ये पाहू लागला.
पाणी होते तळाला.
चोच काही पोचेना.
पाणी काही मिळेना.

काय करावे समजेना.
तहान काही भागेना.

कावळ्याने खूप विचार केला.
शेवटी एक खडा आणला.
मडक्यामध्ये बरोबर टाकला.

खडे टाकले भराभर
पाणी आले वर वर
पाणी प्याला पोटभर.
वाऱ्यावरती पंख पसरून
हुशार कावळा गेला उडून.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त्याचे | कावळ्याने | प्याला | वाऱ्यावरती | मडक्यामध्ये |



## ३२. चर्च

कोंबडा आरवला, अजून सूर्य उगवायचा होता. माय उठली.

तिने पीटरला हाक मारली, ''पीटर ऊठ. हेलन, तू पण ऊठ. आज रविवार. आज चर्चला जायचे आहे.''



पीटर उठला. त्याने तोंड धुतले. हात पाय धुतले. हेलन उठली. तिनेही तोंड धुतले. हात पाय धुतले. मग चांगले कपडे घातले.

पीटर पुढे गेला. पाठोपाठ हेलनही निघाली. चर्चपाशी आली.

चर्चमध्ये आज बरीच गर्दी होती. पीटर आणि हेलन चर्चमध्ये गेली. नंतर पादीगाराने उपदेश केला.

सर्व लोक परत निघाले, पीटर निघाला. हेलनपण निघाली.

आता सूर्य उगवला होता.

पीटरने मागे वळून पाहिले. पांढरी पांढरी चर्च सोनेरी किरणात सुंदर दिसत होती.

| | | | |
|---|---|---|---|
| चर्च | सूर्य | गर्दी | सर्व |



## ३३. हातावरला डाव

चिमुकली धनुकली बोटांची बोटांची
त्यावर गजरे गौरीचे, शैलाचे

आलटुन पालटुन ग पालटुन ग।
खेळा खेळा, गौरी ग शैला ग॥धृ॥



हातावरला डाव ग
गजरा गजरा गोल ग
हातावरला डाव ग
गजरा गजरा झेल ग ॥१॥

एकेकी दोन दुर्की
तीन तिर्की चार चारकी
थापे झिडकी झाली ग
गजऱ्याने मारली उडकी ग ॥२॥

उलट सुलट खालीवर
गजरा गजरा नाचव ग
खेळ आमचा जमला ग
डाव आमचा रंगला ग ॥३॥

आलटुन पालटुन खेळल्या ग खेळल्या ग।
मुळीच नाही हरल्या ग हरल्या ग ॥

| | | | |
|---|---|---|---|
| डाव | चिमुकली | पालटुन | गजरे |
| शैला | गौरी | गोल | |

# ३४. चंदाताई



चंदाताई चंदाताई,
हसतेस का?
झग्यासाठी रुसून
बसतेस का?



चंदाताई चंदाताई,
हिंडतेस का?
दिवसभर सारा
झोपतेस का?
बाबांच्या भीतीने
दडतेस का?



सांग सांग चंदाताई,
कानात मला
आई कधी तुझी
मारते का तुला?





चंदाताई चंदाताई,
आजी कधी तुला
बोलते का?
माझ्यासारखा
गोड गोड पापा
घेते का?

(-नीलिमा आंगले)



## ३५. सुट्टी झाली

परीक्षा संपली. सुट्टी सुरू झाली.
आता मज्जाच मज्जा.




विठ्ठल रानात निघाला.
बरोबर आक्काही निघाली.

दत्ता रानात निघाला.
बरोबर शम्मीही निघाली.
गेली डोंगर माथ्यावर.
फिर फिर फिरली.

विठ्ठलने काढले काजू.
आक्काने काढली करवंदे.
विठ्ठलने पाडली कच्ची कैरी.
आक्काने भेडसे गोळा केली.

विठ्ठल आक्का खूष झाली.
गप्पा मारत घरी पोचली.

| | | | |
|---|---|---|---|
| सुट्टी | दत्ता | विठ्ठल | |
| मज्जा | आक्का | शम्मी | कच्ची |


३६. पहा-बोला-लिहा